## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१४/०२/२०१८
## दि.१३/०२/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १६९/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | सागर दळवी ,पोलीस शिपाई, हडपसर पो. स्टे. पुणे शहर |
| **आरोपी** | मुबारक साहेबकिरा जहाँगीरदार,वय-५० वर्ष,रा.कंधर,ता.करमाळा,जि.सोलापुर (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०२/२०१८ रोजी २२/४५ वा. हडपसर येथील १५ नंबर सिग्नल जवळ पुण्याहुन सोलापुरकडे जाणा-या रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसम मुबारक साहेबकिरा जहाँगीरदार,वय-५० वर्ष,रा.कंधर,ता.करमाळा,जि. सोलापुर याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने बेदरकारपणे चालवुन,नमुद ठिकाणी ट्रक यास पाठीमागुन धडक देवुन, दोन्ही गाडयांचे नुकसान करुन,क्लिनर अबासाहेब विश्वांबर चौधरी यास जखमी करण्यास व स्वतः गंभीर जखमी होवुन,स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शेंडगे ९८२३९२३६१८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ६१/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अमित गोरे, पोलीस उप-निरिक्षक, खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | सुहास दिलिप गुटाळ,वय-२५ वर्षे,रा.शाहूनगर,चिंचवड,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०२/२०१८ रोजी पहाटे ०३/३० वा. त्रिकोणी गार्डन समोर,एलफिस्टन रोड,खडकी, पुणे सार्वजनीक रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सुहास दिलिप गुटाळ,वय-२५ वर्षे,रा.शाहूनगर,चिंचवड,पुणे हा येरवडाकडुन खडकी बाजार,पुणेचे दिशेने स्वतःचे जीवीतास धोका निर्माण होईल अशा रितीने त्याची मोटार सायकलवर भरधाव वेगात,बेदरकारपणे व वाहतुकिचे नियमांचे उल्लंघन करून अशा रितीने चालवुन,त्रिकोणी गार्डन समोर,एलफिस्टन रोड,खडकी बाजार,पुणे येथील रोडचे कडेला असलेल्या झाडास स्वतः धडकून,जोरात खाली पडुन,त्यामध्ये गंभीर जखमी होवुन स्वतःचे मरणास व त्याचे दुचाकीचे नुकसान करण्यास कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, एस.एन.शिंदे |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ६२/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | गणेश पाटणे,पो.हवा. खडकी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अशिफ काशिम शेख,वय-१६ वर्षे,रा.३०१,बी.विंग, निला अपार्टमेंट,खडकी बाजार,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०१८ रोजी ०७/१५ वा. शंकर मंदिरा जवळ खडकी रेल्वे स्टेशनचे पाठिमागे औंध रोड खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी समोरून येणा-या टेम्पो ट्रॅव्हलर स्कुल बसला जोरात धडक देऊन,त्यामध्ये गंभीर जखमी होवुन,स्वतःचे मृत्युस कारणीभुत झाला. तसेच दोन्ही गाडयांचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.ए.कांबळे |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ६६/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | आदर्श सुरवसे,वय-१७,रा.रामनगर,वारजे,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०१८ रोजी १९/३० वा. काकडे यांचे मोकळे पटांगणात रामनगर वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा एम. एस.सी.आय.टी. चा क्लास संपल्यानंतर त्यांचे राहते घरी पायी येत असताना, नमुद ठिकाणी नमुद इसमांनी त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी याना मारहाण करुन त्यांचे खिशातील मोबाईल व बॅग मधील ३००/- रुपये रोख असा एकूण १०,३००/- रु. किचा ऐवज जबरी चोरी करुन चोरुन नेला |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. गायकवाड |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४९/१८,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | भागीरथ पोतदार,वय-२८वर्षे,रा.सॅलेसबरी पार्क,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम वय अंदाजे २० ते २५ वर्षे,मजबुत बांधा, उंचपुरा, आडवे पट्टे असलेला टी शर्ट, जिन्स पॅन्ट, चेहराने गोल,केस काळे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०२/२०१८ रोजी १८/३० वा.गोल्डन बेकरी समोर असणा-या फळ विक्रेता जवळ रोडवर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मित्र अर्जुन गौड,वय-१९ याचेसमवेत नमुद ठिकाणाहुन भाजी आणण्यासाठी पायी जात असताना,नमुद अनोळखी वर्णनाचे इसमाने त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे जवळील १,२००/- रूपये रोख रक्कम व मोबाईल असा एकुण ८,३००/- रू किमतीचा ऐवज जबरदस्तीने हिसकावुन चोरून नेलो आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जे.कदम ९८२३६२४५८५ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे ३२/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | कमलेश गोयल,वय-३१ वर्षे,रा.बिबवेवाडी कोंढवा रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०२/२०१८ रोजी रात्रौ १०/४० वा.न्यु इरा सोसायटी,कम्युनिटी हॉलचे समोर बिबवेवाडी कोंढवा रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद वेळी व ठिकाणी शतपावली करीत असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील एक सोन्याची चैन ६२,५००/-रु किमतीची जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जी.जी.खरात ८८८८८१००६८ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे ४७/१८,भादविक ३९२,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | मनोज कांबळे,वय-२२,रा.सुखसागर नगर,बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/२/१८ रोजी ०१/३० वा. भुत बंगल्या शेजारील कचराकुंडी जवळ,नगर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे कामाचे ठिकाणावरुन त्यांचे राहते घरी जात असताना,नमुद ठिकाणी लघु शंकेकरीता थांबले असता त्यांचे पाठीमागुन आलेल्या नमुद तीन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करुन,फिर्यादी यांचे जवळील मोबाईल व रोख ७ हजार रूपये रक्कम असा एकुण ९ हजार रू किचा ऐवज जबरदस्तीने काढुन घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मगर ९९२१४८०३६३ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे १०२/१८,भादविक ३९४,३४२,३४ |
| **फिर्यादी** | ताजिंदरसिंग भाटीया,वय-४७,रा.देहुरोड,पुणे |
| **आरोपी** | तीन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०२/२०१८ रोजी सकाळी ११/०० वा. स्मशान भुमी जवळील गार्डन मध्ये निगडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचेकडुन इन्व्हरटर बॅटरी २१,५००/- रू किची विकत घेतली असुन ते पैसे फिर्यादी यांना दिले नाही. फिर्यादी हे नमुद ठिकाणी त्यांचे पैस मागण्यासाठी गेले असताना,सदर इसमांनी फिर्यादी यांना नमुद ठिकाणी नेवुन त्यांचे खिशातुन ५ हजार रूपये जबरदस्तीने काढुन घेवुन,व्हावचरवर फिर्यादी यांचा पॅनकार्ड टाकुन,त्यावर ५० हजार रूपये टाकुन सही करण्यास सांगितल्या नंतर फिर्यादी यांनी सही करण्यास नकार दिलयचे कारणावरून त्यांना मारहाण करू,फिर्यादी यांचेकडील कोरे चेकवर सही करून,आधार कार्डाचे तीन छायांकीत प्रती घेवुन,फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी देवुन त्यांचे जवळील ५ हजार रूपये रोख जबरदस्तीने काढुन घेतले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अवताडे ९४२३२७७२१५ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे ८७/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | संदेश जाधव,वय-३२ वर्षे,रा.फुगेवाडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०१८ रोजी दुपारी १२/३० वा. १७/०० वा.चे दरम्यान जाधव निवास,फ्लॅट नं.०६, तिसरा मजला, स.नं.४७७,ओमकार चौक,फुगेवाडी,पुणे येथे फिर्यादी यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण ७,६१,२००/- रुपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अजय भोसले ९८६७२०२८३१ |

१०

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ५६/१८,भादविक ३५३,३५२,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | अभिजीत गोंजारी, पोलीस शिपाई, चंदननगर पो स्टे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०२/२०१८ रोजी २३/०० वा.झेन्सार कंपनीचे समोर चुलबुल ढाबा समोरील रोडवर, खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सरकारी कर्तव्यावर हजर असताना,नमुद ठिकाणी लोकांची खुप गर्दी दिसल्याने गर्दीतील लोकांकडुन माहिती मिळाली की, एका इसमाने टपरी चालविणारे इसमास मारहाण केली आहे असे सांगितल्याने,सदर इसमास त्याचे नाव,पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अमोल कांबळे,रा.थिटे वस्ती,खराडी,पुणे असे सांगितले. त्या दरम्यान नमुद इसम हा सदर ठिकाणी येवुन माझ भावास का पकडुन ठेवले आहे,त्याला लगेच सोडुन दे असे सांगुन,लखन कांबळे याने फिर्यादी यांचे अंगावर धावुन येऊन,तुम्ही मला ओळखत नाही,थिटे वस्ती मध्ये मला सगळे लोक ओळखतात,तुझी नोकरी मिनिटातच घालवतो असे हातवारे करुन,फिर्यादी बरोबर झटापटी करून त्यांना अपशब्द वापरून,जीवे मारणेची धमकी देऊन फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.एस.कारकुड |

११

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे १४४/१८,भादविक ४३६,४३५,४२७,१४३,१४४,१४७ |
| **फिर्यादी** | कलीम शेख,वय-४४ वर्षे,रा.लक्ष्मणनगर थेरगाव,पुणे |
| **आरोपी** | एकुण सहा इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०१८ रोजी पहाटे ०१/०० वा. फिर्यादीचे राहते घराचे जवळ गव्हाणे हॉस्पीटल शेजारी लक्ष्मणनगर,थेरगाव,पुणे व महाराजा हॉटेल डांगे चौक,पुणे समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे यातील नमुद इसमां बरोबर पुर्वी झालेल्या जुन्या भांडणाचा राग धरुन त्यांनी फिर्यादी यांचे मालकीचे त्यांचे राहते घरा जवळ गव्हाणे हॉस्पीटल शेजारी लक्ष्मणनगर, थेरगाव,पुणे येथे पार्क केलेले टाटा टेम्पो, स्कॉरपीओ जीप तसेच हातगाडी व प्लॅस्टीक फळाचे कॅरेट जाळुन,तसेच महराज हॉटेल डांगे चौक,पुणे याठिकाणी पार्क केलेला ट्रकच्या काचा फोडुन नुकसान करुन,सदर भागात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जे.गोडे ९७६२२२०४२४ |

१२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १६८/१८,भादविक ४३५ |
| **फिर्यादी** | अजित इनमादार,वय-३० वर्ष रा.शेवाळवाडी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०१८ रोजी पहाटे ०१/३० वा च्या सुमारास फिर्यादी यांचे राहते घरासमोर स. नं.१९२,लक्ष्मी अळी,शेवाळवाडी ग्रामपंचायत समोर,शेवाळवाडी,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे राहत्या घरासमोर त्यांचे पार्क केलेल्या तीन मोटार सायकली यांचेवर कोणीतरी अज्ञात इसमांनी जाणुनबुजुन आग लावुन त्या जाळुन सदर मोटार सायकलींचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. जगताप ९८२३२३७१७० |

## <u>दि.१४/०२/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे १४९/१८,भादविक ३०७,४५२,४२७ |
| **फिर्यादी** | संदीप सांवत,वय-३७ वर्षे,रा.यश कॉलनी,तापकीरनगर,काळेवाडी,पुणे |
| **आरोपी** | नितीन एकनाथ सावंत,वय-३० वर्ष,रा.बालाजीनगर,पिपरी,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०१८ रोजी सांय ०८.३० वा चे सुमारास फिर्यादीचे घरी यश कॉलणी तापकीरनगर काळेवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा चुलत-चुलत भाऊ नितीन सांवत याची फिर्यादी यांचे पत्नीकडे बघत होता,त्याने फिर्यादी यांचे पत्नीला रस्त्यावर अडवुन बोलत होता. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास मार दिला होता. तेव्हा आरोपीने फिर्यादीस तुला बघुन घेतो अशी धमकी दिली होती. दि.१३/०२/२०१८ रोजी सदर इसमाने त्याचा राग मनात धरून,फिर्यादी यांच्या घरात रॉकेलचा प्लॅस्टीक कॅन आणुन,फिर्यादी यांचे आई याच्याशी वाद घालुन,तीला जीवे ठार मारण्याचे उद्देशाने रॉकेलच्या कॅनला आग लावुन,फिर्यादी यांचे आई श्रीमती.कांताबाई हरीचद्र सांवत,वय-५८ वर्षे,रा.यश कॉलनी,तापकीरनगर,काळेवाडी,पुणे हिस गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, ए.एम.जाधव |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चिंचवड पो स्टे ८१/१८,भादविक ४९८(अ),३०७,३४२ |
| **फिर्यादी** | सौ.हर्षदा उमेश कांबळे,वय-२१,रा.वाल्हेकरवाडी,चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | उमेश मल्हारी कांबळे,वय-३६,रा.वाल्हेकरवाडी,चिंचवड,पुणे (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०२/२०१८ रोजी १४/०० वा. वृंदावन कॉलनी,चिंचवडेनगर,वाल्हेकरवाडी,चिंचवड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा पती यातील नमुद इसम उमेश मल्हारी कांबळे,वय-३६,रा.वाल्हेकर वाडी,चिंचवड,पुणे याने त्याची पत्नी फिर्यादी हिस शारिरीक व मानसिक छळ करून,तीस जीवे मारण्याचे उद्देशाने तीचे अंगावर डिझेल टाकुन तीस जाळुन गंभीर दुखापत करून,तीस जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यानंतर तीचेवर कोणतेही प्रकारचे उपचार न करता,तीस घरात कोंडुन ठेवले आहे. (फिर्यादी हया ३० टक्के भाजल्या आहेत.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.बी.सोडनवर ९८२३६२४८०१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**